## मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ ७ / २०१४--२०१५

संदर्भ :— विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./८/२०१३—२०१४ दिनांक २६/०७/२०१३ पहावे.

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक युएनआय/(१९५/१४)/२०१४/नावि/ विशि—१/३७९७ दिनांक ८ मे, २०१४, अन्वये बनावट पीएच.डी./एम.फील. पदव्यांच्या आधारे राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये नियुक्त्या अथवा सेवा विषयक अन्य लाभ घेण्यात आले असल्यास अशा नियुक्त्या व सेवाविषयक लाभ तात्काळ प्रभावाने काढून घेणे, अशा बनावट पदव्यांच्या आधारे नियुक्त्या देण्यात आलेल्या अध्यापकांविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत इत्यादी स्वरूपाचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यामुळे आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांनी एम.फिल. / पी.एच.डी. पदवी संपादन केलेली आहे त्यांचा तपासणी अहवाल **(verification report)** ज्या विद्यापीठातून पदवी संपादन केलेली आहे तिथून तात्काळ मागवावा व जर तपासणी अहवालात सदरची पदवी बनावट आढळल्यास तसे विद्यापीठास विनाविलंब कळवावे. आपल्याकडून सदरचे अहवाल प्राप्त झाले नाहीत तर त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील व आपणांस बनावट अहवाल प्राप्त होऊनही विद्यापीठास कळविले नाही व कालांतराने विद्यापीठास माहिती मिळाल्यास त्या शिक्षकांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करून त्याप्रमाणे शासनास कळविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तरी सदर माहिती खालील प्रपत्रात तात्काळ १ महिन्यात उपकुलसचिव, घटक महाविद्यालये व संस्था कक्ष, खोली क्र. २०४, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२, या पत्त्यावर पाठवावी.

| अ. क्र. | विद्यापीठ / महाविद्यालयाचे नाव | अध्यापकाचे नाव | सेवा सुरूवात दिनांक | बनावट पदवी प्राप्त केलेला दिनांक | बनावट पदवीच्या आधारे घेतलेले लाभ उदा.वेतनवाढी /कॅस इत्यादी | अशा अध्यापकांविरूध्द केलेली फौजदारी कार्यवाहीबाबतचा तपशील | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

मुंबई -- ४०० ०३२.
दिनांक :-- २० जून, २०१४

(सही) २०/६/१४.
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव / संचालक यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीसाठी रवाना :—

१. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११ ००१.

२. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१.

३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई — ४०० ००१.

४. सह संचालक, पनवेल विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड.

५. ग.सं. कचरे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२.

६. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.

७. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.

८. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.

९. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.

१०. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती)

११. दि जनरल सेक्रेटरी, बॉम्बे युनिवर्सिटी अॅन्ड कॉलेज टिचर्स युनियन, मुंबई विद्यापीठ क्लब हाऊस, बी रोड, चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

१२. युनिवर्सिटी ऑफ मुंबई कॉलेज प्रिन्सिपल्स असोसिएशन, ज्ञानसाधना कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, इटरनिटी मॉलच्या शेजारी, ठाणे (पश्चिम) — ४०० ६०४.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ